# इलेक्ट्रॉनिक्समधील नाविन्यपूर्ण कल्पना व अंमलबजावणी यावर व्याख्यान संपन्न

कोल्हापूर : येथील विवेकानंद महाविद्यालयामध्ये इलेक्ट्रॉनिक्स विभागामार्फत इलेक्ट्रॉनिक्समधील नाविन्यपूर्ण कल्पना आणि अंमलबजावणी या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.



यावेळी एस.जी.एम. कॉलेज कराडचे निवृत्त प्राध्यापक आर. एस. देशमुख यांनी इलेक्ट्रॉनिक्स विषयातील विविध पैलूंचा वापर विविध क्षेत्रात कसा करता येईल, याबर प्रात्यक्षिकांच्या आधारे मार्गदर्शन केले. अल्ट्राव्हायोलेट किरणांचा किटकनाशक म्हणून वापर, अल्ट्रासोनिक फ्रिक्वेन्सीच्या वापराने हवेतील आर्द्रतेचे नियमन, म्युच्युअल इंडक्टन्सच्या सहाय्याने शेती संरक्षणासाठीचे विद्युत कुंपण, इडी करंटचा वापर उष्णता निर्माण करणाऱ्या उपकरणामध्ये कसा केला जातो, अशा बाबींवर सखोल मार्गदर्शन केले. शेवटी ई सायकल व ई बाईक साठीच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या इलेक्ट्रॉनिक्स घटकांचे तत्व व त्याचा वापर याबद्दलची माहिती दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इलेक्ट्रॉनिक्स विभागप्रमुख डॉ. सी. बी. पाटील हे होते. कार्यक्रमाचे नियोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली इलेक्ट्रॉनिक्स विभागाने केले. प्रास्ताविक प्रा. एन. पी. मोटे यांनी केले. आभार प्रा. पी. आर. बागडे यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. पी. एस. जाधव यांनी केले. या कार्यक्रमासाठी विभागातील डॉ. मिलिंद पाटील, प्रा. डॉ. ए. डी. जगार, प्रा. जी. बी. शिंगे आदीसह कर्मचारी तसेच न्यू कॉलेज, राजाराम कॉलेज व विवेकानंद कॉलेजमधील विद्यार्थी उपस्थित होते.

*News in Global Times dated 26/04/2023*

पुढारी

## 'विवेकानंद कॉलेजमध्ये इलेक्ट्रॉनिक्स विभागामार्फत व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद महाविद्यालयामध्ये इलेक्ट्रॉनिक्स विभागामार्फत 'इलेक्ट्रॉनिक्समधील नावीन्यपूर्ण कल्पना आणि अंमलबजावणी' या विषयावर व्याख्यान झाले.

याप्रसंगी एस. जी. एम. कॉलेज, कराडचे निवृत्त प्रा. आर. एस. देशमुख यांनी 'इलेक्ट्रॉनिक्स विषयातील विविध पैलूंचा वापर विविध क्षेत्रात कसा करता येईल', याबाबत प्रात्यक्षिकांद्वारे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इलेक्ट्रॉनिक्स विभाग प्रमुख डॉ. सी. बी. पाटील होते. प्रास्ताविक प्रा. एन. पी. मोटे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. पी. एस. जाधव यांनी केले. प्रा. पी. आर. बागडे यांनी आभार मानले.

My Kolhapur Edition
Apr 28, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

*News in Dainik Pudhari Kolhapur dated 28/04/2023*